## प्रस्तावना –

ग्रामीण भागातील जनतेचे जिवनमान उंचावण्याच्या दृष्टीने सन २००१-०२ पासून संपूर्ण स्वच्छता अभियानाची सुरुवात नंतर निर्मल भारत अभियान व आता स्वच्छ भारत अभियान असे नामकरण करण्यात आलेले आहे. दि. ०२ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत राष्ट्रीय स्तरावरून ग्रामीण स्वच्छतेच्या निर्मल भारत अभियान या कार्यक्रमाची अंमलबजावणी पूर्ण करण्यासाठी स्वच्छ भारत मिशन हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प दि. ०२ ऑक्टोबर, २०१४ पासून सुरू करण्यात आला.

**वैयक्तिक शौचालय बांधकाम (Individual Household Latrine - IHHL)**

संपूर्ण ग्रामीण भागातील कुटुंबांकडे शौचालय सुविधा असणे व त्याचा नियमित/शाश्वत वापर करून ग्रामपंचायत/गाव हागणदारीमुक्त (ODF) करणे.

**सार्वजनीक शौचालय बांधकाम (Community Sanitary Complex - CSC)**

गावामध्ये स्वच्छतेचे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य होण्यासाठी गावामध्ये विविध कारणांमुळे बाहेरून ये-जा करणाऱ्या / स्थलांतरित लोकांसाठी किमान एक सार्वजनिक/सामुदायिक शौचालय असणे आवश्यक असल्यामुळे तशी सुविधा उपलब्ध करून देणे.

**घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन (Solid & Liquid Waste Management - SLWM)**

ग्रामीण भागातील जीवनमानाचा/आरोग्याचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी एकत्र गोळा करून निश्चित केलेल्या ठिकाणी शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करणे/विल्हेवाट लावणे.

**ग्रामपंचायत ८६४**

औरंगाबाद जिल्हयात एकूण ९ तालूके असून ८६४ ग्राम पंचायतीची संख्या असून, महसुली गावे १३२५ आहेत. सन २०१२ मध्ये शौचालय बांधकामाबाबत सर्वेक्षण करण्यात आले. तेव्हा जिल्हयाची एकूण कुटुंब संख्या ३,५८,९५१ इतकी आहे. अंतर्गत ५५७५०, अंतर्गत १३५३८ कुटुंबे, २ ४०६६ असे एकूण ४३२३०५ कुटुंबे आहेत.

त्यापैकी दारिद्रय रेषेखालील शौचालय असलेले ७३९९१ व दारिद्रय रेषेवरील शौचालय असलेली ३५८३१४ इतकी कुटूंबे आहे.

- औरंगाबाद जिल्हा सन २०१७ मध्ये हागणदारी मुक्त घोषित करण्यात आलेला आहे.

## १ जल जीवन मिशनची उद्दिष्ट्ये

1. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला सन 2024 पर्यंत " हर घर नल से जल " याप्रमाणे पाणी पुरवठा करणे
2. प्रत्येक घरात वैयक्तिक नळजोडणीस प्राधान्य
3. प्रत्येक कुटुंबाला शुध्द, स्वच्छ व गुणवत्तापूर्वक पाणीपुरवठा
4. पाणीपुरवठा योजनांची सुधारात्मक पुनरजोडणी व अस्तित्वातील स्त्रोतांचे बळकटीकरण
5. वैयक्तिक नळ जोडणीमुळे पाणी गळती कमी होऊन पाणी बचत होईल व पाणी उपसा कमी होईल
6. पाण्याचा वापर आवश्यकतेनुसार होण्यासाठी सर्वांना समान दाबाने पाणी वाटप होण्याकरिता 100% वॉटर मीटर बसविण्यासाठी जनजागृती
7. शाळा, अंगणवाडी व शासकीय इमारतीमध्ये शंभर टक्के कार्यात्मक नळ जोडणी
8. नळाद्वारे शुद्ध व स्वच्छ पुरेसा पाणी पुरवठ्यामुळे सार्वजनिक आरोग्यात सुधारणा

## 2.जल जीवन मिशन मधून पाणी पुरवठा योजना अंमलबजावणी कार्यपद्धती

1. गावाचे सर्वेक्षण करणे
2. गावाची संपूर्ण माहिती असलेला (डीपीआर) Detail Project Report तयार करणे.
3. योजनेचे अंदाजपत्रक (इस्टिमेट) व तांत्रिक मान्यता (टीएस) व प्रशासकिय मान्यता देणे
4. कार्यारंभ आदेश देणे
5. काम पूर्ण झाल्यानंतर योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करणे.

सदर योजना हस्तांतरित झाल्यानंतर योजनेची देखभाल,दुरुस्तीची जबाबदारी सदर ग्रामपंचायतीची आहे

## 3 पाणीपुरवठा शाश्वत राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना

1. ग्रामपंचायत मधील सार्वजनिक इमारतीवरील पाणी संकलन व्यवस्था रेन वॉटर हार्वेस्टिंग
2. बोरवेलचे रिचार्ज, विहीर पुनर्भरण, शोषखड्डे यांचा भूजल पातळी वाढण्यासाठी वापर करणे
3. पाणीपुरवठा पाइपलाइनची गळती रोखणे त्यासाठी पाईपलाईनची नियमित देखभाल दुरुस्ती करणे
4. पाण्याचा अपव्यय न होण्यासाठी ग्रामस्थांमध्ये प्रबोधन करणे तसेच ग्रामस्थांना पाण्याच्या बचतीची सवय लावणे

## 4 पाणी गुणवत्ता व्यवस्थापन

1. पाण्याचे दुशीतीकरण टाळणे
2. पाण्याच्या उदभवाची निगा राखणे,उद्भवाच्या सभोवतालची स्वच्छता राखणे
3. पाणी स्वच्छता प्रक्रिया क्लोरीनेशन करणे
4. पाण्याच्या उद्भव तसेच पाइपलाइन सांडपाण्याच्या गटारी पासून उकिरड्या पासुन दूर ठेवणे
5. पाणी गुणवत्ता राखण्यासाठी उद्भवातील पाण्याची नियमित रासायनिक व जैविक चाचणी करणे, एफ. टी. के. किट चा वापर करणे
6. गावातील ग्रामस्थांना श्वाश्वत शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होईल,याबाबत विविध उपाययोजना सुनिश्चित करणे

## योजना व उपक्रम –

### वैयक्तिक शौचालय बांधकाम (IHHL-Individual HouseHold Latrines):

सर्व ग्रामपंचायत मधील वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध नसलेली व शासनाच्या अनुदान पात्र असलेली कुटुंबे ( (BPL सर्व ) (APL = SC,ST, SMF, PH,WH,LL) पात्र कुटुंबे) (APL Other पात्र नसलेली कुटुंबे )

| वैयक्तिक शौचालय बांधकाम | एकूण रक्कम | केंद्र हिस्सा (60%) | केंद्र हिस्सा (40%) |
|---|---|---|---|
| | १२०००/- | ७२००/- | ४८००/- |

### सार्वजनीक शौचालय बांधकाम (Community Sanitary Complex - CSC)

सार्वजनिक ठिकाणी सामुहिक शौचालय बांधकाम, उदा. ठराविक वस्ती, मोठ्या बाजाराच्या ठिकाणी, गावात एखाद्या वस्ती मध्ये सामुहिक/सामुदायिक ठिकाणी शौचालय सुविधा उपलब्ध करून देणे.

| सार्वजनीक शौचालय बांधकाम (Community Sanitary Complex - CSC) | एकूण रक्कम | केंद्र हिस्सा (60%) | केंद्र हिस्सा (40%) | १५ वित्त आयोग |
|---|---|---|---|---|
| | ३,००,०००/- | १,२६,०००/- | ८४,०००/- | ९०,०००/- |

### घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन (SLWM) :

ग्रामपंचायत स्तरावरील वैयक्तिक / सार्वजनिक स्तरावरील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणे.

| घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन | | |
|---|---|---|
| ५००० पर्यत लोकसंख्या | घनकचरा व्यवस्थापन | प्रती माणूस ६० रुपये |
| | सांडपाणी व्यवस्थापन | प्रती माणूस २८० रुपये |
| ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | घनकचरा व्यवस्थापन | प्रती माणूस ४५ रुपये |
| | सांडपाणी व्यवस्थापन | प्रती माणूस ६६० रुपये |
| मैला गाळ व्यस्थापन (FSM) ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | | प्रती माणूस २३० रुपये |

## राष्ट्रीय ग्रामीण पेयजल / जल जीवन मिशन जिल्हास्तरीय

| कार्यक्रम / योजना | अ.क्र. | पदनाम | एकूण मंजूर पद संख्या | सद्य स्थितीत पदभरती | सद्य स्थितीत रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| जल जीवन मिशन | 1 | प्रकल्प संचालक/उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.) | १ | १ | ० |
| | २ | कार्यालयीन अधीक्षक | १ | १ | ० |
| | ३ | लेखा अधिकारी (Account Officer) | १ | ० | १ |
| | ४ | लिपिक (Clerk) | १ | ० | १ |
| | ५ | पाणी गुणवत्ता निरीक्षक | १ | १ | ० |
| | ६ | समन्वयक – अंमलबजावणी सहाय्य यंत्रणा (क्षमता बांधणी व प्रशिक्षण) | १ | १ | ० |
| | ७ | समन्वयक () – पाणी | १ | ० | १ |
| | ८ | समन्वयक (पाणी गुणवत्ता) – सनियंत्रण व निरीक्षण | १ | ० | १ |
| | ९ | सहा.समन्वयक लेखा (+) | १ | १ | ० |
| | १० | बहुउद्देशीय कार्य समन्वयक – पाणी | १ | १ | ० |
| | ११ | शिपाई | १ | ० | १ |
| | १२ | माहिती,शिक्षण,संवाद सल्लागार | १ | १ | ० |

## स्वच्छ भारत मिशन (ग्रा) जिल्हास्तरीय

| कार्यक्रम / योजना | अ.क्र. | पदनाम | एकूण मंजूर पद संख्या | सद्य स्थितीत पदभरती | सद्य स्थितीत रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| स्वच्छ भारत मिशन (ग्रा) जिल्हा | १ | समन्वयक (माहिती,शिक्षण,संवाद) | १ | १ | ० |
| | २ | समन्वयक (मनुष्यबळ व विकास) | १ | १ | ० |
| | ३ | समन्वयक () – स्वच्छता | १ | १ | ० |
| | ४ | घनकचरा व्यवस्थापन समन्वयक | १ | ० | १ |
| | ५ | सांडपाणी व्यवस्थापन समन्वयक | १ | ० | १ |
| | ६ | बहुउद्देशीय कार्य समन्वयक – स्वच्छता | १ | १ | ० |
| | ७ | समाज शास्त्रज्ञ | १ | १ | ० |
| | ८ | शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार | १ | १ | ० |
| | ९ | लेखाधिकारी | १ | १ | ० |